दैनिक
# महा मेट्रो

www.mahametronews.in

वर्ष ४ थे : अंक : ११ पुणे, शनिवार, ३० ऑगस्ट २०२५ | RNI NO.MAHMAR2022/87390 | पाने : ४ किंमत : ३.००

VOL NO.04. ISSUE : 11 Pune, Saturay, 30 August 2025 | Pages : 4 PRICE : 3.00

## महत्वाचे...

### चांदीचा कडा देऊन १.३० लाखांची फसवणूक

**चिंचवड । प्रतिनिधी**

चिंचवड येथील न्यु सोनिगरा ज्वेलर्स येथे १२ जुलै रोजी दुपारी ४ वाजता सोन्याचे कडे असल्याचे सांगून प्रत्यक्षात चांदीच्या कड्याला सोन्याचा मुलामा दिला गेला. त्यावर १ लाख ३० हजार रुपये घेऊन फसवणूक करण्यात आली. पोलिसांनी तपास करत असताना या प्रकरणात अमोल सुभाष बलदोटा (३३, रा. मोहननगर, धनकवडी, पुणे) हा आरोपी निष्पन्न झाला असून त्याला अटक केली आहे. तपास पो.उपनिरीक्षक दुधे करत आहेत.

### लग्नाचे आमिष दाखवून तरुणीची फसवणूक

**चिंचवड । प्रतिनिधी**

नेरे दत्तवडी येथील २४ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक केल्याप्रकरणी हिंजवडी येथील एका युवकाला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२५ ते ८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत संबंधित युवकाने पीडित तरुणीचा विश्वास संपादन करून तिच्यासोबत शारीरिक संबंध ठेवले. मात्र, ''जात वेगळी आहे'' असे सांगून लग्न करण्यास नकार दिल्याने तिने पोलिसांत धाव घेतली. या प्रकरणी सुनिल शालीकराम पराळे (वय २६, रा. मारुंजी, हिंजवडी) याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ६९, ३१८(२) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत विविध कलमांनुसार गुन्हा दाखल झाला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

### महाळुंगे एमआयडीसीत व्यवसायिकावर रॉडने हल्ला

**चिंचवड । प्रतिनिधी**

महींद्रा कंपनी गेट क्रमांक २ समोर २७ ऑगस्ट रोजी रात्री हॉटेल व्यवसायिकावर लोखंडी रॉडने जीवघेणा हल्ला करण्यात आला. या प्रकरणी दत्ता सूर्यवंशी, त्याची पत्नी, मुलगा आदित्य, प्रतिक सूर्यवंशी तसेच एका अल्पवयीनासह पाच जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलमान्वये गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेत वाद झाल्यानंतर आरोपींनी दुकानासमोरून लोखंडी ओटी फेकून व्यवसायिकाच्या डोक्यावर मारली. यात कपाळावर आणि डाव्या बाजूस गंभीर दुखापत झाली. त्यानंतर लोखंडी रॉडने वार करताना त्याचा हातही जखमी झाला.

### चिंचवडमध्ये देशी पिस्तूल, जिवंत काडतुसे व कोयत्यांसह युवक अटक

**चिंचवड । प्रतिनिधी**

चिंचवड येथील मदर तेरेसा उड्डाण पुलाजवळील लिंकरोडवर बेकायदेशीर शस्त्रास्त्रांसह एका युवकाला पोलिसांनी अटक केली आहे. ही कारवाई २७ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहा वाजता करण्यात आली. अटकेत आलेल्या युवकाचे नाव उज्वल विनोद लवे (वय २३, रा. रमाबाईनगर, पिंपरी) असे आहे. त्याच्याकडून ५० हजार रुपये किमतीचे देशी पिस्तूल, ५०० रुपयांचे एक जिवंत काडतुसे आणि ६०० रुपये किमतीचे दोन लोखंडी कोयते असा एकूण ५१,१०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तपास सपोनि करंबळकर करीत आहेत.

# डॉक्टरांचे काम न करता पगार; भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयातील प्रकार

## महापालिकेचे कोट्यवधी रुपये खर्च मात्र कमला नेहरू रुग्णालयाला काहीच उपयोग नाही

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे महापालिकेचे मंगळवार पेठेत भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयातील आहे. याच ठिकाणी महापालिकेचे कमला नेहरू रुग्णालय आहे. वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयाचे पाचवे वर्ष आहे. या वैद्यकीय महाविद्यालयात तब्बल ५०० विद्यार्थी आहेत. तर पाचशेच्या वर डॉक्टरां पासून ते शिपाई कर्मचारी आहेत. यातील काही विभागातील डॉक्टरांनी कमला नेहरू रुग्णालयालात रूग्णांना सेवा देणे अपेक्षित आहे. मात्र अनेक जण रूग्णालयात सेवाच दे नाहीत.



त्यामुळे या डझनभर डॉक्टरांचा पगार काढू नये असे पत्र कमला नेहरू रूग्णालयाचे अधिक्षक डॉ प्रशांत बोते यांनी महापालिकेच्या आरोग्यप्रमुखांना दिले आहे.

राज्यातील अनेक महापालिकेत वैद्यकीय महाविद्यालये होती. त्यामुळे पुणे महापालिकेच्या मालकीचे वैद्यकीय महाविद्यालय असावे अशी मागणी होत होती. त्यामुळे महापालिकेने अनेक वर्षांनंतर २०२० मध्ये भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्यात आले. या वैद्यकीय महाविद्यालय पाचशेच्या वर

पान ३ वर...

### ना ओळख पत्र ना ॲप्रन

**भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयात सध्या ४०० विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांची ओळख म्हणजे वैद्यकीय महाविद्यालयाचे आयकार्ड व ॲप्रन आहे. मात्र अनेक विद्यार्थी ना ओळखपत्र गळ्यात घालतात ना अंगात ॲप्रन त्यामुळे वैद्यकीय महाविद्यालय गेल्यावर शिपाई, कर्मचारी, डॉक्टर कि विद्यार्थी हे समजत नाही. अनेक विद्यार्थी तर महाविद्यालय फिरकतच नाहीत त्यामुळे यांच्याकडून रूग्ण सेवा लांबच राहिले.**

> **भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयातील काही डॉक्टरांचा पगार थांबविले आहे. ही वस्तुस्थिती आहे.**
>
> **– डॉ सीमा प्रतिनिधी , अधिष्ठाता, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय , पुणे महापालिका**

# तुषार हिंगे यांचा राजीनामा, संतोष तापकीर यांचा आत्मदहनाचा इशारा!

**चिंचवड । प्रतिनिधी**

आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी जाहीर केलेल्या नूतन कार्यकारणीवरून पक्षात प्रचंड असंतोष उफाळून आला आहे. या कार्यकारणीत आमदार महेश लांडगे यांचेच वर्चस्व असून, आमदार शंकर जगताप यांच्या गटातील कार्यकर्त्यांना डावलण्यात आल्याची चर्चा रंगली आहे. यामुळे माजी उपमहापौर तुषार हिंगे यांनी पदाचा राजीनामा दिला



असून, भोसरीतील संतोष तापकीर यांनी थेट आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

**जंबो कार्यकारणी आणि नाराजी**

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी ३०० कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेत १२६ जणांची जंबो कार्यकारणी जाहीर केली. यात ४ सरचिटणीस, ८ उपाध्यक्ष, ८ सचिव, १ कोषाध्यक्ष व १०० हून अधिक सदस्यांचा समावेश आहे. नवनवीन चेहऱ्यांना संधी दिल्याचा दावा काटे यांनी केला असला तरी कार्यकर्त्यांच्या नाराजीला वाट मोकळी झाली. फक्त एका आमदाराच्या सांगण्यावर नावे ठरली; ठराविक कार्यकर्त्यांनाच चांगली पदे देण्यात आली, असे आरोप करण्यात येत आहेत.

**तुषार हिंगे यांचा संताप**

मोरवाडी, शाहुनगर व मासुळकर कॉलनी परिसरात प्रभाव असलेले माजी उपमहापौर तुषार हिंगे यांनी थेट काटे यांच्याशी हुज्जत घातली. उपमहापौरपदावर असताना मध्येच राजीनामा द्यायला लावला, नंतर युवक अध्यक्षपदाचा राजीनामा घेतला, आता पुन्हा अन्याय केला, अशी नाराजी व्यक्त करत त्यांनी पदाचा राजीनामा दिला.

**संतोष तापकीर यांचा आत्मदहनाचा इशारा**

चारोळीतील संतोष तापकीर यांनी पक्षावर तीव्र नाराजी व्यक्त केली. गेल्या ३० वर्षांपासून भाजपमध्ये काम केले, परंतु फक्त आश्वासने मिळाली. संघटनेत सतत

पान ३ वर...

# तक्रार केलेलेच खड्डे बुजवले, शेजारील खड्ड्यांकडे दुर्लक्ष

## पथ विभागाच्या कामकाजावर नागरिकांचा रोष

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत तक्रारींसाठी पुणे महापालिकेने पीएमसी रोड मित्र हे विशेष ॲप सुरू केले असले तरी त्याचा उपयोग केवळ दिखावा ठरत असल्याची नागरिकांची नाराजी आहे. कारण या ॲ पवरून जी तक्रार दाखल केली जाते तेवढाच खड्डा बुजवला जातो, मात्र त्या खड्ड्याभोवती असलेले इतर खड्डे तस्सेच ठेवले जातात. त्यामुळे नागरिकांनी पथ विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, फक्त तक्रारीपुरतेच खड्डे बुजवले जातात हा आरोप जोर धरू लागला आहे. पुणे महापालिकेच्या रस्ते विभागाने नुकतेच हे ॲरप सुरु केले.

पान ३ वर...

# ताम्हिणी घाटात दोन एसटी बस समोरासमोर धडकल्या; १५ जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील ताम्हिणी घाट परिसरात आज (शुक्रवार) सकाळी भीषण अपघात झाला. चाचिवली गावाजवळ दोन एसटी बस समोरासमोर धडकल्याने प्रवाशांमध्ये एकच गोंधळ उडाला. या अपघातात तब्बल १५ प्रवासी जखमी झाले असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

हा अपघात आज सकाळी साधारण ९ वाजताच्या सुमारास घडला. पुणे-कोलाड महामार्गावरील ताम्हिणी घाट हा




निसर्गरम्य आणि पर्यटनासाठी प्रसिद्ध असला तरी वळणदार व अरुंद रस्त्यामुळे नेहमीच धोकादायक मानला जातो. सध्या गणेशोत्सव काळ असल्याने पुणे-कोकण मार्गांवर प्रवाशांची प्रचंड गर्दी असून अपघातांची संख्या वाढली आहे. अपघाताची कारणमीमांसा मिळालेल्या

पान ३ वर...

# दीड दिवसांच्या एकूण २,०५५ गणपतींचे विसर्जन

**पुणे । प्रतिनिधी**

गणेशोत्सवादरम्यान विसर्जन प्रक्रिया सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडावी यासाठी पुणे महापालिकेने सर्व आवश्यक तयारी पूर्ण केली आहे. दीड दिवसांच्या गणपतींचे विसर्जन लक्षात घेऊन घाट आणि कृत्रिम हौदांवर सर्व व्यवस्था करण्यात आल्या आहेत. महापालिका प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी दीड दिवसांच्या शहरात एकूण २०५५ गणपतींचे विसर्जन करण्यात आले. यामध्ये महापालिकेने विसर्जन घाटांवर दिलेल्या लोखंडी हौदांमध्ये सर्वाधिक १४१९ गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले.



पुणे शहराचा गणेशोत्सव जगप्रसिद्ध आहे. पवित्र शहराच्या गौरवशाली परंपरेनुसार, पुणेकरांनी गणरायाच्या भक्तीत स्वतः ला झोकून दिले आहे. पुणे महापालिकेने विसर्जनाची तयारी पूर्ण केली आहे. महापालिकेच्या सर्व १५ प्रादेशिक कार्यालयांनी त्यांच्या क्षेत्रातील विसर्जन हौद, लोखंडी हौद, निर्माल्य कलश, मंडप व्यवस्था यासह विविध तरतुदी केल्या आहेत. विसर्जन घाटांवर असलेल्या हौदांना रंगरंगोटी करण्यात आली आहे.

पान ३ वर...

> **नागरिकांना प्रशासनाला सहकार्य करण्याचे आणि पर्यावरणपूरक आणि सुरक्षित पद्धतीने गणपती विसर्जन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शक्य तितके कृत्रिम हौद वापरा आणि नदीत विसर्जन टाळा.**
>
> **-संदीप कदम, उपायुक्त, घनकचरा विभाग, पुणे महापालिका.**

# परिमंडळ चारमध्ये ४६ गुन्हेगारांची कारागृहात रवानगी

## २६ गुन्हेगारांना शहर आणि जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार; शंभर गुन्हेगारांवर कारवाईची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर आणि उपनगरातील गणेशोत्सव शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी पोलिसांनी विविध उपाययोजना करीत आहे . गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ चार मध्ये ४६ गुन्हेगारांची कारागृहात रवानगी केली आहे. तर २६ गुन्हेगारांना शहर आणि जिल्ह्यातून दोन वर्षांसाठी तडीपार केले आहे. येरवडा पोलीस ठाण्यातील सर्वाधिक १५ गुन्हेगारांचा त्यात समावेश आहे. परिमंडळ चार अंतर्गत कार्यक्षेत्रातील शंभरहून अधिक गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची शक्यता आहे.

### दहा दिवसांसाठी २३७ हद्दपार...

**२६ गुन्हेगारांवर तडीपारी आणि ४६ जणांची कारागृहात थेट रवानगी व्यतिरिक्त गणेशोत्सव काळात विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत पोलीस उपायुक्त सोमय मुंडे यांनी परिमंडळातील एकूण २३७ गुन्हेगारांना शहरातून हद्दपार केले आहे. गणेशोत्सव काळात या गुन्हेगारांनी हद्दीत येणार मनाई आहे.यामध्ये येरवडा ३०, चंदननगर ११,विमानतळ २५, लोणीकंद ११,वाघोली ४०,खराडी ६,बाणेर २५,खडकी ४१,विश्रांतवाडी १७ आणि चतु:श्रृंगी पोलीस ठाण्यातील ३१ सराईत गुन्हेगारांचा समावेश आहे.**

शहर आणि उपनगरात मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा केला जातो.गणेशोत्सव काळात कुठेही अनुचित प्रकार किंवा भांडणे होऊन कायदा व सुव्यवस्था निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांकडून दरवर्षी गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जाते. त्यामुळे गुन्हेगारी अंकुश ठेवण्यास मदत होते. परिमंडळ चार अंतर्गत बाणेर, चतु:श्रृंगी, खडकी, विश्रांतवाडी, येरवडा, विमानतळ, चंदननगर, खराडी, वाघोली आणि लोणीकंद पोलीस ठाण्यांचा समावेश होतो. परिमंडळ चार चा पदभार स्वीकारल्यापासून उपायुक्त सोमय मुंडे यांनी गुन्हेगारांवर कडक भूमिका घेत प्रतिबंधात्मक कारवाई तीव्र केली आहे.

गावठी दारू विक्री, गंभीर दुखापत बेकायदा हत्यारे बाळगणे, दहशत माजविणे,जीवे मारण्याचा उद्देश, चोरी आणि बलात्कारा सारखे गंभीर गुन्हे दाखल असणाऱ्या २६ रेकॉर्ड वरील गुन्हेगारांना शहर आणि जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले आहे. यातील येरवडा ठाण्यातील १५,बाणेर ३, वाघोली, चंदन नगर, चतुः श्रृंगी प्रत्येकी २ आणि खराडी व लोणीकंद मधील प्रत्येकी १ गुन्हेगारांचा समावेश आहे.याशिवाय तब्बल ४६ गुन्हेगारांची थेट कारागृहात रवानगी केली आहे. गणेशोत्सव काळात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर गुन्हेगारांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारल्याने गुन्हेगारांचे चांगलेच धाबे दणाणले आहे.

> **''दोन आणि त्यापेक्षा जास्त गुन्हे दाखल असणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली जात आहे.परिमंडळातील शंभर गुन्हेगारांवर पोलीसांचे लक्ष आहे.शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आणखीन प्रतिबंधात्मक कारवाई केली जाणार आहे.''**
>
> **– सोमय मुंडे, पोलीस उपायुक्त परिमंडळ ४**




# वैतागलेल्या वेटरकडून हॉटेल चालकाचा खून

**पुणे । प्रतिनिधी**

कोंढवे धावडे परिसरात मंगळवारी रात्री उशिरा घडलेल्या घटनेने शहर हादरले आहे. शुल्लक कारणावरून संतापलेल्या एका वेटरने हॉटेल चालकावर धारदार चाकूने वार करत त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संतोष शेट्टी (वय ४५ वर्षे) हे कोंढवे धावडे येथील हॉटेल चालवत होते. मंगळवार, २६ ऑगस्ट रोजी रात्री साडेआठ ते पावणे नऊच्या सुमारास हॉटेलमध्येच त्यांचा वेटर दिलीप गिरी (वय ३९, मूळ लातूर) याने चाकूने वार करून खून केला. संतोष शेट्टी यांनी नेहमीप्रमाणे गिरीलाकाम व्यवस्थित कर; अशा सूचना दिल्या होत्या. त्यावरून संतप्त झालेल्या गिरीने स्वयंपाकघरातून धारदार चाकू आणून बसलेल्या शेट्टी यांच्या मानेवर सलग दोन वार केले. गंभीर जखमेमुळे शेट्टी यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

दिलीप गिरी काही दिवसांपूर्वीच या हॉटेलमध्ये

पान ३ वर...

संपादकीय....

# पुणे शहराला ‘सिटी प्लॅनर’ चा अभाव

पुणे शहर हे देशातील आठव्या क्रमाकांचे शहर आहे. मात्र या शहरात ‘शहर नियोजनकार‘ (सिटी प्लॅनर) नाही. त्यामुळे गेल्या तीस वर्षांत पुणे शहराचा आर्थिक विकास खुंटला आहे. यासह सामाजिक न्याय नियोजन (सोशल जस्टीस प्लॅन) कोसोदूर आहे. शहराचे नियोजन सिव्हील इंजिनियरच्या हाती त्यामुळे पुणे शहराचा विकास नियोजनबद्ध झालेला नाही .

भारतीय संविधानातील ७४ घटना दुरूस्तीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचे महत्त्व अधोरेखित केले आहे. ज्या प्रमाणे ग्रामपंचायत स्तरावर ‘ग्रामसभेला’ होते. त्याच प्रमाणे उच्च न्यायालयाने २००९ साली महापालिका स्तरावर वर्षातून दोन वेळा क्षेत्रसभा (एरिया सभा) घेण्याचे आदेश दिले आहेत. या सभा प्रत्येक दोन ते तीन मतदान केंद्र निहाय होणे अपेक्षित आहे. मात्र गेली पंधरा वर्षे राज्यातील कोणत्याच महापालिकेने क्षेत्र सभाच घेतली नाही. हा न्यायालयाचा अवमान आहे. तर दुसऱ्या बाजूला मतदार राजा प्रशासनाला प्रश्न विचारत नसल्याचे वास्तव आहे. महापालिकेने संविधानाच्या कलम ६० प्रमाणे माहिती दिली पाहिजे. तर कलम ९४ प्रमाणे महापालिका प्रशासनाने त्यांच्या कामाचा लेखाजोखा व अर्थसंकल्पातील खर्च जाहीर करणे बंधनकारक आहे. मात्र, ते करत नाहीत. शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. पायाभूत सुविधांना बळकटी आणण्यासाठी व येणाऱ्या काळात पुणे शहराच्या वाढत्या लोकसंख्येचा विचार करून पुरेशा प्रमाणात पायाभूत सुविधा उपलब्ध व्हायला हव्यात. त्यासाठी तात्कालिक विचार न करता दीर्घकालीन व व्यापक उपाययोजना राबवाव्या लागतील.

पुणे शहरातील तीनशे किलोमीटर अंतराच्या मुख्य रस्त्यावर ८५ टक्के वाहतूक आहे. तर १९०० किलोमीटरच्या अंतर्गत रस्त्यावर १५ टक्के वाहतूक आहे. अनेक रस्त्यावर मिसिंग लिंक, बॉटलनेक आणि पावसाचे पाणी साचत असल्यामुळे वाहतूक मंदावते. त्यामुळे शहरातील वाहतूकीची समस्या गंभीर होत आहे. शहरातील वाढती दुचाकींची संख्या ही शहराचे आरोग्य बिघडविणारे आहे. इंडियन रोड कॉंग्रेसच्या (आयआरसी) निकषाप्रमाणे कमी खर्चाचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. एकेरी वाहतूक, वाहनतळ व्यवस्थापन, सिग्नल व्यवस्थापन, वाहतूकीच्या नियमांचे फलक , यु टर्न आदींचा विचार करणे आवश्यक आहे. पुणे शहर सांस्कृतिक राजधानी व विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जातेच; पण आता ‘आयटी हब’चे शहर म्हणूनही ओळख प्राप्त झाली आहे. वेगाने वाढणाऱ्या पुणे शहराला शाश्वत विकासासोबतच नागरी जीवन सुसह्य कसे होईल, हेही समोर ठेवून आखणी व नियोजन करावे लागणार आहे. प्रामुख्याने, नागरी समस्या सोडवण्यात लोकसहभागाची भूमिका, आरोग्यदायी पुणे शहरासाठी सार्वजनिक आरोग्याचा सर्वसमावेशक दृष्टिकोन, शहरी वनीकरण व शाश्वत विकासावर संवाद झाला. आज विविध पातळ्यांवर बदल घडत असताना नव्या पिढीतील तरुणांची भूमिका महत्त्वाची ठरणारी आहे. नवे विचार, नव्या संकल्पना, विकासाच्या नव्या शाश्वत मांडण्या यांची गरज निर्माण झाली आहे. तरुणांनी पुढाकार घेऊन यावर काम केले पाहिजे.

कोव्हिड १९ पेक्षा क्षयरोग गंभीर आजार जगात कोव्हिड १९ पेक्षा क्षयरोग हा गंभीर आजार आहे. एक लाख लोकंसख्येमागे १८० जणांना तर वस्तीमध्ये हेच प्रमाण सहाशे ते सातशे जणांना क्षयरोग आहे. तर यापैकी तीन ते पाच टक्के क्षयरोग असलेल्या रुग्णांना अँटीबायोटिक औषधे देऊन सुद्धा उपयोग होत नसल्याचे समोर आले आहे. सार्वजनिक आरोग्य आणि कम्युनिटी हाऊसिंग आणि शिक्षण महत्त्वाचे आहे. शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगले नसले तर स्मार्ट शहर उपयोगाचे नाही. त्यामुळे पुणे शहराचे नियोजनबद्ध विकास होणे आवश्यक आहे. पुणे शहराच्या विकासात धोरणात्मक विसंगती देखील प्रकर्षाने जाणवते. शहर विस्ताराची गती लक्षात न घेता महापालिकेच्या हद्दवाढीच्या निर्णयांचा योग्य अभ्यास झाला नाही. परिणामी, नव्याने समाविष्ट झालेल्या गावांना पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, सांडपाणी शुद्धीकरण, रस्ते, आरोग्यसेवा यांसारख्या मूलभूत सुविधांचा अजूनही अभाव आहे. ही तफावत मिटवण्यासाठी स्वतंत्र ‘सिटी प्लॅनिंग सेल’ तयार करून त्यांना दीर्घकालीन नियोजनाचा अधिकार दिला पाहिजे.

याशिवाय, पुणे शहराला वाहतूक कोंडी, वायूप्रदूषण, पाणीटंचाई आणि कचरा व्यवस्थापन या तिन्ही आघाड्यांवर झगडावे लागत आहे. स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत काही कामे सुरु असली तरी ती ठिकठिकाणी अर्धवटच अडकलेली आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) आधारित वाहतूक नियंत्रण, पर्जन्यजल संधारण आणि हरित उर्जेचा वापर या गोष्टी शहर नियोजनात गांभीर्याने समाविष्ट कराव्या लागतील. पुणे शहराचा खरा विकास केवळ भौतिक पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नाही. शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पर्यावरण संरक्षण आणि सांस्कृतिक वारसा जपणे हेसुद्धा त्याच्याइतकंच महत्त्वाचं आहे. त्यामुळे पुढील वीस वर्षांचा विचार करून ‘व्हिजन डोक्युमेंट’ तयार करण्याची गरज आहे. त्यात स्थानिक नागरिकांचा सहभाग, तज्ज्ञांचा सल्ला आणि शासन यंत्रणेचा समन्वय या त्रिसूत्रीवरच पुणे शहराचे शाश्वत व आरोग्यदायी भविष्य उभे राहू शकते.

पुणेकरांचा जीवनमान उंचावण्यासाठी स्थानिक प्रशासनाने केवळ मोठे प्रकल्प उभारण्यापेक्षा लोकाभिमुख धोरणांना प्राधान्य द्यायला हवे. उदाहरणार्थ, परवडणारी घरे, सार्वजनिक रुग्णालयांची सक्षमता, मोफत किंवा कमी दरात उपलब्ध होणारी आरोग्य तपासणी, तसेच स्थानिक बाजारपेठा व लघुउद्योगांना प्रोत्साहनया उपायांनी सर्वसामान्य नागरिकांच्या अडचणी कमी होऊ शकतात. दुसरीकडे, पर्यावरणीय संतुलन राखणे ही तातडीची गरज आहे. नदीकाठची अतिक्रमणे, डोंगरकड्यांवरील अनियंत्रित बांधकामं आणि झपाट्याने कमी होणारी हिरवाई यामुळे पुण्याच्या हवामानावर आणि आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. शहराचा विकास पर्यावरणपूरक पद्धतीने करण्यासाठी कठोर धोरणे, जनजागृती आणि नागरिकांचा सक्रीय सहभाग हे तिन्ही घटक अत्यावश्यक आहेत.

# सुधारगृहातील मुलांना समुपदेशनासह मानसिक औषधोपचाराची गरज

## विधी संघर्षीत मुलांचे केवळ पोषण आहारा सोबत अपवादात्मक कौशल्याचे धडे

शहर व उपनगरात किरकोळ गुन्ह्यांपासून ते गंभीर गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

उपनगरात शाळा गळतीचे वाढते प्रमाण, बेरोजगारी, व्यसनाधीनतेमुळे ते गुन्हेगारी विश्वात प्रवेश करतात. यापैकी अनेक मुलांची रवानगी सुधारगृहात केली जाते. तेथे केवळ त्यांचे पोषण होते. खेळ व व्यावसायिक कौशल्ये अपवादात्मक शिकविली जातात. मात्र त्यांना मानसिक स्वास्थासाठी समुपदेशनासह औषधोपचाराची गरज असल्याचे मत सामाजिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी ‘सीविक मिरर’कडे व्यक्त केले आहे.

अल्पवयात हातून किरकोळ आणि गंभीर गुन्हा झालेल्या मुलांना ‘विधी संघर्षित बालक’ संबोधले जाते. पुणे जिल्ह्यात येरवड्यात विधी संघर्षीत मुलांसाठी पंडित जवाहरलाल नेहरू उद्योग केंद्रात बाल सुधारगृह आहे. राज्यात जवळपास प्रत्येक जिल्ह्यात मुलांसाठी निरीक्षणगृहे आहेत. ही निरीक्षणगृहाची जबाबदारी राज्याचे महिला व बालविकास आयुक्तालयाकडे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जिल्हा महिला व बालविकास अधिकारी जिल्ह्यातील सुधारगृहातील व विशेष निरीक्षणगृहातील दैनंदिन कामकाज पाहतात. मात्र येथील मुलांच्या पोषणासह काही प्रमाणात खेळ व व्यावसायिक कौशल्यांची धडे दिले जातात. यामध्ये ही मुले रमत नाहीत. अशा मुलांना समुपदेशनासह औषधोपचाराची गरज असल्याचे मत व्यसनमुक्ती केंद्रातील समुपदेशकांचे आहे.

गेल्या वर्षाभरात बाल सुधारगृहात एकूण तीनशे मुलांना दाखल करण्यात आले आहे. यामध्ये अल्पवयीन मुलांचा खून, खुनाचा प्रयत्न, चोरी, मारामारी सारख्या गंभीर गुन्ह्यात सहभागी आहे. गेल्या काही काळापासून



विधी संघर्षीत मुलांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले असल्याचे निरीक्षण आहे.

बाल सुधारगृहात काही काळ ठेवल्यानंतर बाल न्यायालयाच्या आदेशाने मुलांना मुक्त केले जाते. पण बाहेर पडल्यावर मुले पुन्हा वाईट संगत आणि व्यसनामुळे पुन्हा गुन्हेगारी विश्वाकडे वळत असल्याचे सूत्रांनी सांगितले. त्यामुळे विधी संघर्षीत मुलांना सुधारगृहातच समुपदेशनासह औषधोपचार करण्याची गरज आहे. त्यामुळे त्यांची व्यसनमुक्ती होऊ शकते. यासह समुपदेशनाच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये सकारात्मक बदल घडविता येऊ शकतात असे व्यसनमुक्ती क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांनी सांगितले.

### टोळीत सहभागी

स्थानिक गुन्हेगारी टोळ्यांच्या आश्रयाला विधी संघर्षीत मुले शहरातील स्थानिक गुन्हेगारी टोळ्यांच्या आश्रयाला वस्त्यांमधील गरीब, शाळा सोडलेले, व्यसनाधीनतेमध्ये अडकलेली मुले आहेत. त्यांना पैशाचे आमिष दाखवून त्यांना आपल्या टोळीत सहभागी करून घेतले जाते. त्यानंतर त्यांचा वापर किरकोळ गुन्ह्यांपासून ते मोठ्या गंभीर गुन्ह्यांसाठी केला जातो. अशा मुलांना जणू प्रशिक्षणच दिले जाते.

“ सुधारगृहातील मुलांना समुपदेशनासह औषधोपचाराची गरज आहे. तरच ही मुले व्यसनमुक्त होतील. त्यानंतर विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांना व्यावसायिक कौशल्य दिले पाहिजे. चांगला नागरिक घडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

– डॉ अजय दुधाणे, आनंदवन व्यसननुक्ती केंद्र

“ ‘गरिबी, अशिक्षितपणा, मित्रांची वाईट संगत, व्यस-नाधीनता आणि इतर कारणांमुळे वस्त्यांमधील मुले गुन्हेगारीकडे वळतात. त्यांच्या हातून गुन्हा घडून जातो. ही मुले सुधारगृहात दाखल झाल्यावर त्यांचे मानसिक स्वास्थासाठी विशेष प्रयत्न केले जात नाहीत.

– माजी अधिक्षक,
पंडित जवाहरलाल नेहरू आद्योगिक शाळा व सुधारगृह

# भटक्या विमुक्त समाजाला ओबीसी मधून वगळावे

गेली ५० वर्षे आम्ही ३१ ऑगस्ट हा भटक्या विमुक्तांचा विमुक्त दिन म्हणून शासनाने जाहीर करावा अशी मागणी करत होतो. शासनाने आता या ऐतिहासिक गोष्टीची दखल घेऊन ३१ ऑगस्ट हा विमुक्त दिन म्हणून साजरा करण्याचा जो निर्णय घेतला त्याबददल मी शासनाचे आभार मानतो व अभिनंदन करतो... भटक्या विमुक्तांच्या आश्रमशाळांसाठी राज्य शासनाने जे निर्णय घेतलेत त्याबददलही शासनाचे मला अभिनंदन करावयाचे आहे. सरकारचे जे निर्णय झालेत ते खरोखर कौतुकास्पद आहेत. उदाहरणार्थ शासनाने राज्यभरातील आश्रमशाळेतील मुलांना टॅब दिलेत, सौरऊर्जेवर चालणारी पथदिव्यांची व आश्रमशाळांमध्ये लागणारी लाईटची व्यवस्था निर्माण करुन दिली आहे. किचन, डायनिंग, अत्याधुनिक करण्याचा प्रयत्न केला आहे. संस्थांना आता अनुदानासाठी हेलपाटे मारावे लागणार नाहीत. संस्थांच्या खात्यावर अनुदान डायरेक्ट जमा होत आहे व मधल्या एजन्सीज बाजूला केल्या आहेत. त्यामुळे मुलांचे भोजन अनुदान आता डायरेक्ट संस्थांच्या खात्यावर जमा होणार आहे. सर्व शाळांना वॉशिंग मशीन पुरवण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१९ साली या मुलांचे अनुदान १५०० रु केले होते. व आत्ताच्या सरकारने पुन्हा त्यात वाढ करुन २२०० रु अनुदान केले आहे. देवेंद्र फडणवीस यांचे आमचे कितही वैचारिक मतभेद असले तरीही शासन म्हणून त्यांनी जे निर्णय केलेले आहेत. त्याबददल हा गरीब समाज त्यांचा सदैव ऋणी राहील.

आता मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना मला नम्र विनंती करायची आहे. भटका विमुक्त समाज हा बलुतेदार नाही किंवा गाव गाडयातला नाही हा समाज गावकुसाबाहेर लांब रानावनात राहणारा आहे. मुळचे हे सगळे आदिवासी आहेत. १८७१ च्या गुन्हेगार जमाती कायद्याने यांना कलंकित केले होते. भिक मागणे, चोऱ्या माऱ्या करुन पोट भरणे असे जगणाऱ्या माणसांना ओबीसींच्या यादीमध्ये घालणे हा या समाजावर झालेला मोठा अन्याय आहे. हा अन्याय दुर करुन पुर्वीसारखे भटके विमुक्त अ आणि ब या ४२ जमातींचा स्वतंत्र संवर्ग पुर्वी केला होता तसाच तो करावा व बहूजन कल्याण खात्यातून आम्हांला बाजूला करुन आमच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ५.५० टक्के बजेट हे या समाजाला देण्यात यावे. आमचे स्वतंत्र खाते करावे व आमच्या पुर्नवसनाचा क्रांतीकारक निर्णय करावा म्हणजे सरकारच्या तिजोरीतले पैसे हे या गरीब समाजापर्यंत पोहचतील. आम्हाला कोणाबरोबरही जोडू नये कारण पुर्व अस्पृश्यांच्या खालच्या जमातीतले आम्ही आहोत. हा अन्याय दूर केला तर या समाजाला समाजाच्या मुख्य

प्रवाहात येता येईल. भटक्या विमुक्तांच्या यादी मधला अ आणि ब यांना फडणवीस सरकारने न्याय द्यावा व पुर्नवसनाच्या स्वतंत्र योजना यांच्या साठी कराव्यात. गेली ५० वर्षे आम्ही सातत्याने संघर्ष करत आहोत परंतु या प्रश्नाकडे कोणीही लक्ष देत नव्हते. शासनाने आता सामाजिक न्यायाची भुमिका घ्यावी व आम्हाला न्याय द्यावा.

**– उपकार लक्ष्मण माने**

# दुमजली पुलाचा ‘दर्जा’ – थाट-माटात उद्घाटन, निकृष्टपणात वाहनचालकांचे प्राण धोक्यात!

पुणे शहर वाहतुकीच्या वाढत्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी उभारण्यात आलेला दुमजली पूल हा निश्चितच एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील प्रचंड दगदगी, वेळेची नासाडी आणि प्रदूषण कमी करण्यासाठी अशा प्रकारच्या आधुनिक सोयी उभारल्या जाणं गरजेचं आहे. प्रशासनानेही या पुलाच्या कामाकडे प्राधान्य दिलं आणि मोठ्या उत्साहात त्याचं उद्घाटन पार पडलं. पण, काही दिवसांतच समोर आलेल्या त्रुटींमुळे या प्रकल्पाची प्रतिमा धुळीस मिळण्याचा धोका निर्माण झाला आहे. नागरिकांच्या तक्रारी, त्यांच्या वैध अस्वस्थता आणि अपघाताचा वाढलेला धोका याकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे.

खरे तर असा पूल उभा राहणं ही संपूर्ण पुणेकरांसाठी आनंदाची बाब ठरली पाहिजे होती. मात्र, काही ठिकाणी जोडणी नीट न झाल्याने गाड्या धडकतात, खडी साचल्याने दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका जाणवतो आणि दिशादर्शक फलक नसल्यामुळे गोंधळ निर्माण होतो, अशा तक्रारी ऐकून या सोयीचा आनंद कमी होतो. काम पूर्ण झाल्यानंतरही त्यात सुधारणा किंवा दुरुस्ती करणे आवश्यक आहे, हे यावरून स्पष्ट होतं. पायाभूत सुविधा उभारताना केवळ वेगावर भर न देता दर्जाकडे अधिक लक्ष दिलं पाहिजे, ही बाब पुन्हा अधोरेखित झाली आहे. प्रशासनाचा हेतू चांगलाच आहेवाहतुकीची सोय करणे, नागरिकांना वेळेची बचत मिळवून देणे, आणि शहर अधिक आधुनिक बनवणे. पण एखादी सुविधा लोकांसाठी उपयोगी ठरण्याऐवजी जर अस्वस्थता, गोंधळ किंवा धोका निर्माण करीत असेल, तर तिचा मूळ उद्देशच अपूर्ण ठरतो. यामुळे लोकांमध्ये निराशा पसरते. पुणेकरांना




विकास हवा आहे, पण त्याचबरोबर तो दर्जेदार आणि सुरक्षितही हवा आहे, ही त्यांची अपेक्षा रास्त आहे. यामध्ये उपायही सोपे आहेत. पुलाच्या जोडणीच्या ठिकाणी नीट दुरुस्ती करून वाहनांना समतोल रस्ता मिळवून देणं गरजेचं आहे. खडी पसरलेली असेल तर ती तातडीने साफ करणं आवश्यक आहे. त्याचबरोबर दिशादर्शक फलक स्पष्टपणे आणि योग्य ठिकाणी लावल्यास वाहनचालकांचा गोंधळ कमी होईल. स्वागत फलक पडून अस्वच्छता पसरलेली असेल, तर ती दुरुस्ती ही देखील वेळेत केली जाऊ शकते. हे उपाय फार खर्चिक नाहीत; फक्त लक्ष आणि जबाबदारीने केलेली देखभाल हवी. या प्रसंगातून आणखी एक शिकवण घेणं महत्त्वाचं आहे. शहरात उभारल्या जाणाऱ्या कोणत्याही नव्या पायाभूत सुविधेसाठी केवळ उद्घाटनावर भर न देता, काम पूर्ण झाल्यानंतर त्याचा प्रत्यक्ष वापर कसा होतो, यात नागरिकांचा अनुभव काय आहे, हे तपासणं तितकंच गरजेचं आहे. अशा मोठ्या प्रकल्पांचे ‘पोस्ट-ऑडिट’ झालं, म्हणजे तांत्रिक दोष, डिझाईनमधील त्रुटी आणि प्रत्यक्ष वापरकर्त्यांचा अभिप्राय लक्षात घेऊन पुढची कामं अधिक दर्जेदार केली जाऊ शकतील. नागरिकांच्याही काही जबाबदाऱ्या आहेत. पुलावर घाण पसरू नये, दिशादर्शक फलकांची हानी होऊ नये, याची काळजी घेणं हे आपलं कर्तव्य आहे. सुविधा टिकवण्यासाठी नागरिकांनीही शिस्तबद्ध वर्तन करणं अपेक्षित आहे. कारण कोणताही पूल, रस्ता किंवा सुविधा केवळ प्रशासनाची नाही तर संपूर्ण समाजाची मालमत्ता असते. म्हणूनच या प्रसंगाकडे दोषारोपाच्या नजरेतून न पाहता, सुधारण्याच्या संधी म्हणून पाहण्याची गरज आहे. प्रशासनाने नागरिकांच्या तक्रारी तातडीने सोडवल्या, तर लोकांचा विश्वास वाढेल. नागरिकांना देखील थोडा संयम राखून, तक्रारी रचनात्मक पद्धतीने मांडाव्या लागतील. अखेरीस, पुणेकरांचा उद्देश एकच आहेवाहतुकीचा त्रास कमी व्हावा आणि सुरक्षित, सुखकर प्रवास साध्य व्हावा. उद्घाटन थाटामाटात झालं, हा दोष नाही; पण उद्घाटनानंतरची देखभाल दुर्लक्षित होणं हा खरा प्रश्न आहे. हाच धडा पुढील प्रकल्पांसाठीही लागू होतो. शहराच्या विकासयात्रेत दर्जा, सुरक्षितता आणि नागरिकांचा विश्वास या तीन गोष्टींची तडजोड होऊ नये, हीच खरी प्रगती ठरेल. पुण्यासारख्या शहरात जेव्हा वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करून उड्डाणपूल उभारला जातो, तेव्हा नागरिकांची अपेक्षा असते की हा पूल दीर्घकाळ टिकावा, सुरक्षित असावा आणि खरोखरच वाहतुकीला दिलासा द्यावा. पण वास्तव वेगळं दिसत आहे. उद्घाटनावेळी फुलांचा वर्षाव, रंगीबेरंगी फलकं, मंत्र्यांचे भाषण आणि मोठ्या थाटामाटाचा कार्यक्रम झाला, मात्र त्यानंतर लगेचच या पुलातील दोष उघडकीस आले. नागरिकांनी जे मुद्दे मांडले आहेत ते किरकोळ नाहीत, कारण खडी, उंचवटे आणि जोडणीतील त्रुटी या सर्व गोष्टी थेट अपघातांना कारणीभूत ठरू शकतात. शहरात आधीच वाहतुकीच्या गोंधळामुळे अपघातांची संख्या वाढत असताना, नव्या पुलामुळे ही समस्या अधिक गंभीर होईल अशी भीती व्यक्त होत आहे.

**– विक्रम कदम –**

## पक्ष्यांची ओळख

# नीलपंख




या पक्ष्याला हवेत उडताना पाहिले कि मन प्रसन्न होते. उडताना त्याच्या पंखांमध्ये असणाऱ्या, आकाशी व गडद निळ्या रंगाच्या पिसांच्या आकर्षक छटांमुळेच, त्याला निलपंख हे नाव पडले आहे. पंखांच्या व शेपटीच्या टोकांवर देखिल गडद निळा रंग दिसून येतो. या आकाराच्या इतर पक्ष्यांच्या तुलनेत, या पक्ष्याच्या डोक्याचा आकार जरा मोठा असतो व डोक्यावरहि आकाशी रंगाचा छप्पा दिसून येतो. चोच काळी असून, चोचीपासून शेपटीपर्यंत वरील भाग मातकट तपकिरी रंगाचा असतो. माने पासून छातीवर देखिल याच रंगाची लवदार पिसे दिसून येतात. हे पक्षी गावांतील विरळ वृक्षांच्या भागात, तसेच माळरानावरील वृक्षांवर आढळून येतात, विजेच्या तारांवर, किंवा झाडाच्या फांदीच्या निष्पर्ण शेंड्यावर बसून, सरडे, बेडूक, व किटकांच्या हालचालीवर लक्ष्य ठेवून असतात. हालचाल दिसताच क्षणाचाही विलंब न लावता पंख मिटून सुर मारत भक्ष्य चोचीने पकड़तो. हवेत उडत असताना या पक्ष्याच्या पंखांची हालचाल, हलकी व लयबद्ध असते. कोकणात उन्हाच्या तडाख्यातून वाचण्यासाठी ‘‘नीलपंख‘‘ फणस, आंबा, भोकर यांसारख्या दाट सावलीच्या वृक्षांचा आश्रय घेतो. झाडाच्या ढोलीत गवत व पालापाचोळा भरून घरटे तयार करतो.

विणीचा हंगाम- मार्च ते जुलै.

**– दिपक शिंदे. (पक्षिमित्र व निसर्ग अभ्यासक)**

## कविता

# आरसा



एकदा घरातला आरसा बोलू लागला
आपलं मन प्रत्येका पुढं खोलू लागला !
अहो बाबा .. दाढी करताय :
की मला साबणाच्या पाण्यानं आंघोळ घालताय !
बाबा माफ करा माफ पण खरं सांगा ..
केलं कां कधी मला साफ ? : १
अहो आई .. किती करता घाई . !
कपाळाच्या टिकल्या .. मला का लावता बाई ! २
अंग ताई .. किती वेळा समोर येणार ?
कॉलेजला उशीरात उशीर रोजच करणार ? . ३
अरे लाडक्या भावा .. केसाला भांग कशाला पाडतोस ..
कापू नकोस केस .. . .. पोनी बांध आता .
तुझ्याकडे बघतील सारेच जाता जाता ! ४
आजीबाई आजीबाई . सुरकुत्या पडल्या ..
तुमच्या गालावर म्हणून रुसलात का उगाच असं माझ्यावर ! . ५
आजेबा तुम्ही तर माझ्याकडे ढुंकुन ही पाहत नाही .
कारण तुम्हाला आहे माहित .. मी खरे तेच बोललो ..
आता तुमचं वय सांगतो ! . ६
. बरं का बाबांनो .. .... मी आहे हा असा !
तुम्ही हसाल तर . मी सुद्धा हसेन !
तुम्ही रडाल तर .. मी पण रडेन !
जे असते ते दाखवतो असा मी आहे आरसा ! .
दाखवितो मी प्रतिबिंब म्हणून वागावे नेहमी बरे ! .
करू नये सदा न् कदाही तुझे नि माझे खरे ! .

**– बाळकृष्ण बाचल विद्यानगर . पुणे ३२**
**भ्रमणधनी –९३७ ३३ १०९१९ . !**

**‘दैनिक महा मेट्रो’, मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे- ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.**
**वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.**
**मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.)** Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com

पान १ वरून

## भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टरांचे काम न करता पगार

पदे आहेत. तब्बल २२ विभाग आहेत. यातील चौदा विभागातील डॉक्टरांनी शेजारीच असलेल्या कमला नेहरू रूग्णालयात रूग्णांना सेवा देणे अपेक्षित आहेत. मात्र अनेक डॉक्टर नेहरू रूग्णालयात फिरकतच नाहीत. त्यामुळे बोते यांनी या डॉक्टरांचा पगार काढू नका अशी विनंती आरोग्य प्रमुखांना केली आहे. हा केवळ डॉक्टरांचा प्रश्न नाही तर अनेकजण रूग्णालयात हजेरी लावून बाहेर पडतात. तज्ज्ञ डॉक्टरांना दोन लाख, सहायक डॉक्टरांना एक सव्वा लाख तर इतरांना साठ ते सत्तर हजार पगार आहे. मात्र काम काहीच नाही असा प्रकार आहे.यावर कोणीच ब्र काढत नसल्याचे दिसून येते.

**५० डॉक्टर दिमतीला पण दुपारनंतर घरी**

मंगळवार पेठेतील कमला नेहरू रूग्णालयात ५०पेक्षा डॉक्टर रूग्णांच्या दिमतीला आहेतं मात्र अनेक डॉक्टर दुपारीच घरी जातात. यावर त्यांच्यावर कारवाई अद्याप झाली नाही. विशेष बाब म्हणजे या डॉक्टरांवर देखरेख व नियंत्रण करणारेच दुपारी तीन वाजताच महापालिकेत बैठक असल्याचे सांगून बाहेर पडतात. या बाबात महापालिकेचे आरोग्य प्रमुख डॉ निना बोराडे यांनी संबंधितांना तंबी देऊन सुद्धा हा प्रकार थांबलेला नाही.

## तुषार हिंगे यांचा राजीनामा, संतोष तापकीर यांचा आत्मदहनाचा इशारा!

खच्चीकरण होत असून आता विश्वास उडाला आहे. योग्य तो विचार न झाल्यास दोन दिवसांत पक्षकार्यालयासमोर आत्मदहन करणार, असा थरारक इशारा त्यांनी पत्राद्वारे दिला.

**सचिन काळभोर यांचे आरोप**

निगडीतील कार्यकर्ते सचिन काळभोर यांनीही पत्रक काढून गंभीर आरोप केले. भाजपचे माजी चिटणीस असलेल्या काळभोर यांनी नगर समस्यांवर आक्रमक भूमिका घेतली आहे. ते आमदार शंकर जगताप यांचे कट्टर समर्थक असून, मागील विधानसभा निवडणुकीत त्यांनी महेश लांडगे यांना उमेदवारी देऊ नये, अशी ठोस भूमिका घेतली होती.

**दोन आमदारांचे गटतट ठळक**

भाजपमधील गटबाजी आता स्पष्ट झाली आहे. शंकर जगताप यांच्या समर्थकांना कार्यकारणीत डावलून, महेश लांडगे यांच्या समर्थकांना झुकते माप दिल्याचा आरोप आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत उमेदवारीच्या वाटपावरही या गटबाजीचा परिणाम होणार, अशी चिंता कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

## दीड दिवसांच्या एकूण २,०५५ गणपतींचे विसर्जन

निर्माल्य नदीच्या पाण्यात फेकू नये म्हणून विविध ठिकाणी निर्माल्य कलश बसविण्यात आले आहेत. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, कृत्रिम तलावांमध्ये सहा फूट उंचीच्या गणेश मूर्तींचे विसर्जन करणे बंधनकारक आहे. यासाठी महापालिकेने १५ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ३८ कृत्रिम तलाव आणि २८१ ठिकाणी ६४८ लोखंडी तलाव बसवले आहेत. तसेच ३३८ ठिकाणी निर्माल्य कलश आणि २४१ मूर्ती दान केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. दरम्यान, गुरुवारी (दि. २८ ) पुणेकरांनी आपल्या लाडक्या बाप्पाचे दीड दिवस विसर्जन केले. महापालिकेने दिलेल्या आकडेवारीनुसार, गुरुवारी शहरात दीड दिवस एकूण २०५५ गणपतींचे विसर्जन करण्यात आले. यामध्ये सर्वाधिक १४१९ गणेश मूर्ती लोखंडी तलावांमध्ये विसर्जित करण्यात आल्या. महापालिकेने बसवलेल्या कृत्रिम तलावांमध्ये ४२० गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. मूर्ती दान केंद्रांमध्ये २१६ मूर्ती गोळा करण्यात आल्या.

## ताम्हिणी घाटात दोन एसटी बस समोरासमोर धडकल्या; १५ जखमी

माहितीनुसार, श्रीवर्धन–बीड ही एसटी बस कोकणातून पुण्याकडे येत होती. दरम्यान, एका तीव्र वळणावर बस चालकाचा अचानक गाडीवरील ताबा सुटला. ब्रेक नीट लागला नाही, त्यामुळे बस डोंगराच्या कडेला थांबविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र त्याचवेळी समोरून चिंचवड–खेड एसटी बस येत होती आणि दोन्ही बसांची जोरदार धडक झाली. धडकेनंतर बसचे मोठे नुकसान झाले असून काही प्रवासी सीटमध्ये अडकून पडले. ग्रामस्थ आणि प्रवाशांची धावपळ अपघात होताच परिसरातील ग्रामस्थ, प्रवासी तसेच महामार्गावरून जाणारे वाहनचालक मदतीला धावले. त्यांनी जखमींना बसमधून बाहेर काढून रुग्णवाहिकेद्वारे पौड ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांकडून जखमींवर प्राथमिक उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे सांगितले जात आहे.

**पोलिस प्रशासनाचा इशारा**

या अपघातानंतर पोलिस प्रशासनाने चालकांना अत्यंत सावधगिरीने वाहन चालविण्याचे आवाहन केले आहे. तसेच प्रवाशांनीही गर्दीच्या काळात दक्ष राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ताम्हिणी घाटातील या अपघातामुळे पुन्हा एकदा घाटरस्त्यावरील सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## तक्रार केलेलेच खड्डे बुजवले, शेजारील खड्ड्यांकडे दुर्लक्ष

नागरिकांना रस्त्यांवरील खड्ड्यांचे फोटो–व्हिडिओ काढून थेट तक्रार करता यावी, यासाठी हे अ‍ॅप उपलब्ध करून देण्यात आले. आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते याचे अनावरण झाले. तक्रारी दाखल केल्यानंतर ७२ तासांच्या आत खड्डे बुजवले जातील आणि कामात निष्काळजीपणा करणाऱ्या कनिष्ठ अधिकाऱ्यावर कारवाई केली जाईल, असा गाजावाजा करण्यात आला होता. या अ‍ॅ पद्वारे आतापर्यंत ७८७ तक्रारी आल्या असून त्यातील ६९२ तक्रारींचे निराकरण झाल्याचा दावा आहे. मात्र, नागरिकांनी निदर्शनास आणून दिल्यानुसार, अनेक ठिकाणी एका खड्ड्याची तक्रार नोंदवली असता तोच खड्डा बुजवला गेला, पण आसपास पडलेले इतर खड्डे तसेच राहिले. यामुळे पथ विभागाचे काम केवळ कागदोपत्री व दिखाव्यासाठी असल्याची भावना निर्माण झाली आहे. एका खड्ड्यासाठी पथक जागी आले असताना शेजारील खड्डे न बुजवणे ही सरळसरळ निष्काळजीपणाची वृत्ती आहे, असा नागरिकांचा रोष आहे. दरम्यान, पीएमसी रोड मित्र अ‍ॅजपलाही गेल्या काही दिवसांत तांत्रिक अडचणी येत आहेत. सुरुवातीला सहज तक्रारी नोंदवल्या जात होत्या, मात्र आता फोटो अपलोड होण्यास विलंब होत आहे. त्यामुळे नागरिक तक्रारी कमी प्रमाणात करत असून, अ‍ॅपची कार्यक्षमता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

## वैतागलेल्या वेटरकडून हॉटेल चालकाचा खून

कामावर रुजू झाला होता. रुजू होताच त्याने मालकांकडून अडीच हजार रुपये आगाऊ घेतले होते. त्यानंतरही तो आणखी पैशांची मागणी करत होता. मात्र शेट्टी यांनी ÏÏÏ;आधी काम नीट करÏÏÏ; असे बजावल्याने तो रागावला होता. याच कारणावरून त्याने संतापाच्या भरात खून केल्याचे समोर आले आहे. घटनेनंतर परिसरात मोठी खळबळ उडाली. हॉटेलमधील इतर कामगार व ग्राहकांनी पोलिसांना कळवले. उत्तमनगर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत दिलीप गिरी याला ताब्यात घेतले असून, त्याच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या हत्याकांडामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले जाणार असून पुढील तपास सुरू आहे.

# शहरातील २७ विसर्जन घाटांवर जीव रक्षकांची नियुक्ती!

## विसर्जन काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडून विशेष तयारी

**चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात दरवर्षीप्रमाणे यंदाही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. गणेशोत्सवाला २७ ऑगस्टपासून सुरुवात झाली असून हा उत्सव ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत चालणार आहे. या काळात नागरिकांच्या सुरक्षेसाठी महापालिकेच्या अग्निशमन विभागामार्फत विशेष उपाययोजना आखण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सव काळात विसर्जन घाटांवर होणारी गर्दीची शक्यता लक्षात घेता, दुर्घटना टाळण्यासाठी अग्निशमन दल व आपत्ती व्यवस्थापन विभागाने व्यापक नियोजन केले आहे. पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील २७ अधिकृत गणेश विसर्जन घाटांवर सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. प्रत्येक घाटावर जीव रक्षकांसाठी लागणारे साहित्य लाईफ जॅकेट, लाईफ रिंग, दोरी, मेगाफोन इत्यादी उपलब्ध करून देण्यात आले आहे.

घाटावरील जीव रक्षक नागरिकांना सहज ओळखता यावेत, यासाठी त्यांना अग्निशमन विभागाकडून दिलेले ऍप्रन परिधान करणे अनिवार्य करण्यात आले आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापनासाठी अग्निशमन दलाच्या वाहनांसह रबर बोट, पथक आणि संपर्क अधिकारी घाट परिसरात सुसज्ज ठेवण्यात आले आहेत. दरम्यान, विसर्जन घाटांवर नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टिने काळजी घ्यावी. गणेश मूर्तीचे विसर्जन करण्यासाठी घाटावर गेल्यानंतर नदीपात्रात उतरू नये, लहान मुलांना पाण्याजवळ एकटे सोडू नये, तसेच रेस्क्यू पथक व पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन केले आहे.

> **“अग्निशमन विभाग व आपत्ती व्यवस्थापन पथकांकडून घाटांवर सतत गस्त ठेवण्यात येणार आहे. आमच्याकडे रेस्क्यू ऑपरेशनसाठी प्रशिक्षित पथक, लाईफ जॅकेट्स, लाईफ रिंग्स, अग्निशमन वाहनांवर बोटी आणि बचावासाठी आवश्यक साहित्य तयार आहे. नागरिकांनी देखील सुरक्षेच्या दृष्टिने विसर्जन घाटावर गेल्यानंतर पाण्यात खोलवर जाणे टाळावे. मदतीची गरज असल्यास रेस्क्यू पथकाशी तात्काळ संपर्क साधावा.**
> **– उमेश ढाकणे, सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

> **“गणेशोत्सव काळात नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देऊन महापालिकेकडून नियोजन करण्यात आले आहे. २७ अधिकृत विसर्जन घाटांवर प्रशिक्षित जीव रक्षक, अग्निशमन वाहनांवर रेस्क्यू बोटी, आपत्कालीन संपर्क यंत्रणा आणि आवश्यक ती उपकरणे उपलब्ध ठेवण्यात आली आहेत. नागरिकांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने महापालिकेकडून उपाययोजना करण्यात येत आहेत.**
> **– प्रदीप जांभळे पाटील,**
> **अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**



**जीव रक्षक पथकांचे समन्वय अधिकारी**

- किवळेगाव (पवनानदी), रावेत घाट (जलशुद्धीकरण केंद्र), रावेत भोंडेवस्ती (मळेकर) – अनिल डिंबळे – ७२६२०२३३२०
- पुनावळे गाव (राममंदिर), ताथवडे स्मशान घाट, वाल्हेकरवाडी जाधव घाट, प्राधिकरण तळे (गणेशतलाव) – गौतम इंगवले – ९२७०३१६३१६
- थेरगाव पूल नदीघाट, मोरया गोसावी पवना नदी, केशवनगर (चिंचवड घाट) – चंद्रशेखर घुळे – ९९२२२५७९८५
- पिंपरी स्मशानभूमी घाट, सुभाषनगर घाट, काळेवाडी स्मशान घाट – बाळासाहेब वैद्य – ९८२२७७४०४९
- काटेपिंपळे घाट, पिंपळे गुरव घाट, पिंपळे निळख घाट, वकड गावठाण घाट, कस्पटे वस्ती घाट – विजय घुगे – ८८८८८३७५४३
- सांगवी स्मशान घाट, सांगवी दशक्रिया घाट, सांगवी वेताळबाबा मंदिर घाट – सुनील फरांदे – ७३८१८१२७०१
- कासारवाडी स्मशानभूमी घाट, फुगेवाडी स्मशानभूमी घाट, बोपखेल घाट – दिलीप गायकवाड – ९७६७३०५३२४
- चिखली स्मशान घाट, मोशी नदीघाट – विनायक नाळे – ९३७०९१५५७६
- मोशी खाण (इ) प्रभाग – विकास नाईक – ९८५०८९०४०३

# नवीन थेरगाव रुग्णालयात पहिली युरोलॉजी शस्त्रक्रिया यशस्वी!

**चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयात युरोलॉजी विभागातील पहिली मोठी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. ६४ वर्षीय रुग्णास मूत्रपिंडात अनेक गाठी असल्यामुळे दाखल करण्यात आले होते. या रुग्णास मधुमेहजन्य आम्लता (डायबेटिक केटोॲसिडोसिस), डाव्या हृदयपिंडाच्या स्नायूंची वाढ (लेफ्ट व्हेंट्रिक्युलर हायपरट्रॉफी) व डायस्टॉलिक डिसफंक्शन अशा गुंतागुंतीच्या



तक्रारीही होत्या.

शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाची तब्येत स्थिर ठेवण्यासाठी ॲनेस्थेशिया व मेडिसिनविभागाने समन्वय साधून आवश्यक ती पूर्वतयारी केली. या शस्त्रक्रियेसाठी जनरल ॲनेस्थेशिया देण्याची जबाबदारी डॉ. अर्चना गांधी, डॉ. पूजा कुलकर्णी, डॉ. पूनम माने व डॉ. अर्जित रेपुरिया यांनी सांभाळली. शस्त्रक्रियेच्या वेळी रुग्णाच्या रक्तातील साखरेचे प्रमाण, श्वसन–रक्ताभिसरण संतुलन तसेच शस्त्रक्रियेतील स्थिती यांचा विशेष विचार करून काटेकोर व्यवस्थापन करण्यात आले. शस्त्रक्रिया युरोसर्जन डॉ. सुनील पालवे आणि डॉ. हनुमंत फड यांनी कौशल्यपूर्णरीत्या पूर्ण केली. मूत्रपिंडाच्या वरच्या व खालच्या भागाला लागून असलेली तब्बल १० X १० सें. मी. आकाराची गाठ यशस्वीरीत्या काढण्यात आली. संपूर्ण शस्त्रक्रिया कोणतीही गुंतागुंत न होता सुरळीतपणे पूर्ण झाली.

> **“युरोलॉजी विभागात झालेल्या शस्त्रक्रियेत ॲनेस्थेशिया, मेडिसिन, युरोलॉजी तसेच नर्सिंग अशा सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करून उत्कृष्ट समन्वय साधला. त्यामुळेच ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करणे शक्य झाले झाले.**
> **– डॉ. लक्ष्मण गोफणे,**
> **आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका**

> **“नवीन थेरगाव रुग्णालयात युरोलॉजी विभागातील पहिली मोठी शस्त्रक्रिया यशस्वी होणे ही पिंपरी चिंचवड महापालिका वैद्यकीय विभागासाठी अभिमानाची बाब आहे. महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे आमचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. त्यामुळे नागरिकांना उत्तम उपचार सेवा स्थानिक पातळीवर मिळण्यास मदत होत आहे.**
> **– विजयकुमार खोराटे,**
> **अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# काठापूर खुर्द गावात ६४ हजार रुपयांच्या विजेच्या केबलची चोरी

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील काठापूर खुर्द गावात अज्ञात चोरट्यांनी तब्बल ६४ हजार रुपये किमतीच्या विजेच्या केबल्सची चोरी केल्याची धक्कादायक घटना बुधवारी (ता. २७) मध्यरात्री घडली आहे. या चोरीत एकाच वेळी सात शेतकऱ्यांच्या केबल्स चोरट्यांनी पळवल्या असून, यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.

घोडनदीच्या काठावर शेतीसाठी शेतकऱ्यांनी पाणी पुरवठ्याकरिता विद्युत पंप बसवले आहेत. या पंपांना वीज पुरवठा करण्यासाठी शेतकऱ्यांनी खांबापासून विजेच्या केबल्स जोडल्या होत्या. मात्र, मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी नदीच्या काठावरील खांबांपासून ते थेट विद्युत पंपांपर्यंत असलेल्या केबल्स चोरून नेल्या. सकाळी शेतकऱ्यांना चोरीचा प्रकार लक्षात आला तेव्हा मोठा गोंधळ उडाला. या घटनेमुळे सात शेतकऱ्यांचे एकूण ६४ हजार रुपये किमतीचे नुकसान झाले असून, चोरी गेलेल्या केबल्समध्ये पॉलीकॅप आणि टेक्समो या नामांकित कंपन्यांच्या महागड्या केबल्सचा समावेश आहे. या प्रकरणी रामदास रघुनाथ दाते (वय ३४, रा. काठापूर खुर्द) यांनी शिरूर पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, शेतीपंपांसाठी वापरल्या जाणाऱ्या महागड्या केबल्सवर चोरट्यांचा डोळा असल्याने परिसरातील शेतकरी चिंतेत आहेत. अशा प्रकारे वारंवार चोरीच्या घटना घडत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. पोलिसांनी चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांना गजाआड करावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## तात्पुरती वीज संच उभारणीसाठी खबरदारी घेण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेशोत्सवा निमित्त तात्पुरती वीज संच मांडणीची उभारणी करताना नागरिकांनी खालील प्रमाणे खबरदारी घेण्याबाबत अधिक्षक अभियंता, पुणे प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ हे.ना.गांगुर्डे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये आवाहन केले आहे.

शक्यतो तात्पुरती वीज संच मांडणीची उभारणी करण्यात येऊ नये. वीज संघ मांडणीस कमीत कमी जोड असावेत, वीज संच मांडणीची उभारणी अधिकृत विद्युत ठेकेदार यांचेकडूनच करण्यात यावी, लोखंडी साहित्य वापरुन स्टेज उभारणी केल्यास धातूच्या भागास सक्षम भुसंबंधन/आर्थिंगशी जोडण्यात यावे. वीज संच मांडणीस अर्थ लिकेज सर्किट ब्रेकर अथवा तत्सम उपकरणाची (स्वीचगिअर) ची जोडणी करण्यात यावी, गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये शोभायात्रा गाडयांची उंची नियमानुसार राखावी जेणेकरुन उघडया वीज वाहिनीच्या संपर्कात येणार नाही. वीज संच मांडणीवर क्षमतेपेक्षा जास्त भार (लोड) जोडण्यात येऊ नये. संचमांडणी सहजासहजी लहान मुलांच्या संपर्कात येणार नाही, याचीही खबरदारी घेण्याचे आवाहन श्री. गांगुर्डे यांनी केले.

## मराठा–ओबीसी आरक्षण प्रश्न तापला; दोन्ही आंदोलनाने महाराष्ट्र पेटण्याची चिन्हे

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा चिघळला असून आगामी काही दिवसांत राज्यभरात आंदोलनाची तीव्र लाट उसळण्याची शक्यता आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत आमरण उपोषण सुरू केल्यानंतर आता ओबीसी समाजानेही ठाम भूमिका घेत नागपुरात साखळी उपोषण सुरू करण्याची घोषणा केली आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला हजारो मराठा बांधवांनी उपस्थित राहून आझाद मैदान दणाणून सोडले आहे. मराठा



समाजाला तात्काळ आरक्षण द्यावे, जातनिहाय अन्याय सहन करणार नाही, अशा गर्जना करत मराठा समाज सरकारला धडा शिकविण्याच्या भूमिकेत आहे. नागपुरात ओबीसी महासंघाचे साखळी उपोषण दरम्यान, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी ३० ऑगस्टपासून नागपुरात साखळी उपोषण सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यांच्या मागण्या स्पष्ट आहेत. ओबीसी प्रवर्गातून मराठ्यांना आरक्षण देणार नाही, याचे लेखी आश्वासन सरकारने द्यावे. मुख्यमंत्र्यांनी तातडीने ओबीसी प्रतिनिधींशी चर्चा करावी. अन्यथा साखळी उपोषण पुढे नेऊन आमरण उपोषण केले जाईल. या आंदोलनाला भाजप नेते आशिष देशमुख आणि आमदार परिणय फुके यांनी खुले समर्थन दिले आहे. तसेच सर्वपक्षीय ओबीसी आमदारांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**आंदोलन त्यांचं प्रकरण : तायवाडे**

मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत विचारले असता डॉ. तायवाडे यांनी मौन बाळगले. त्यांचं आंदोलन सुरू ठेवायचं की थांबवायचं, हे त्यांचं प्रकरण आहे. मात्र ओबीसी प्रवर्गातून मराठ्यांना आरक्षण देण्यास आम्ही ठाम विरोध करतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

**राज्य सरकारसमोर मोठा पेच**

एकीकडे मुंबईत मराठा समाजाचे उपोषण आणि दुसरीकडे नागपुरात ओबीसींचे साखळी उपोषण – यामुळे राज्य सरकारसमोर प्रचंड पेच निर्माण झाला आहे. दोन्ही समाज आपापल्या मागण्यांवर ठाम असून, आंदोलन तीव्र झाल्यास राज्यातील कायदा व सुव्यवस्था धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे.

# नागरिकांच्या अर्थसंकल्पातील सक्रिय सहभागाला मिळतोय प्रतिसाद!

## अर्थसंकल्प २०२६–२७ अधिक लोकाभिमुख व सर्वसमावेशक करण्यासाठी अभिप्राय नोंदवण्याचे आवाहन

**चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अर्थसंकल्पात नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाला यंदाही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

शहरातील विविध प्रभागांतील नागरिक आपल्या परिसरातील स्थानिक गरजा व दीर्घकालीन सुविधा लक्षात घेऊन मोठ्या प्रमाणावर अभिप्राय देत आहेत. मागील वर्षांप्रमाणे यंदाही या उपक्रमाला नागरिकांचा प्रतिसाद मिळत असून, या माध्यमातून अर्थसंकल्प अधिक लोकाभिमुख, सर्वसमावेशक व पारदर्शक होण्यास मदत होणार आहे.

या उपक्रमाद्वारे रस्ते, पादचारी मार्ग, उद्याने, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, पथदिवे, सार्वजनिक सुरक्षा, आरोग्य सुविधा, वाहतूक व्यवस्थापन तसेच हरित उपक्रम अशा विविध क्षेत्रांमध्ये

नागरिकांनी दिलेल्या अभिप्रायांचा विचार केला जाणार आहे. नागरिकांकडून आलेल्या अभिप्रायांचे संकलन व छाननी पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर केला जात आहे. छाननीनंतर त्या अभिप्रायांचा प्राधान्यक्रम ठरवून निधीचे वाटप करण्यात येईल. तरी पिंपरी चिंचवड शहरातील जास्तीतजास्त नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

**अभिप्राय कसा नोंदवावा?**

नागरिकांना महापालिकेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरून अभिप्राय नोंदवता येईल.

तसेच नागरिक या https://www.surveymonkey.com/r/D8TBZRH लिंकला भेट देऊन ऑनलाईन अभिप्राय नोंदवू शकता.

नागरिकांनी दिलेल्या अभिप्रायांचा विचार करून त्या भागातील विकास कामांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद केली जाणार आहे.

नागरिकांनी दिलेले अभिप्राय एकदा नोंद झाल्यानंतर त्यांची ऑनलाईन ट्रॅकिंग सुविधा देखील उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे पारदर्शकता अधिक वाढेल.

> **“अर्थसंकल्पात कोणत्या कामांचा समावेश असावा, यासाठी नागरिकांनी दिलेल्या अभिप्रायांमुळे स्थानिक गरजांची अचूक नोंद होऊन शहराच्या विकासाला दिशा मिळते. या प्रक्रियेमुळे केवळ सुविधा उभारणीच नव्हे तर नागरी जीवनमान सुधारणा, सार्वजनिक सेवांमध्ये समानता आणि संसाधनांचा योग्य वापर साध्य होतो. नागरिकांच्या अभिप्रायांचा विचार करून आणि कामांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यासाठी अर्थसंकल्प २०२५–२६ मध्ये जवळपास १३९ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. यंदाही नागरिकांनी अधिकाधिक अभिप्राय देऊन अर्थसंकल्प २०२६–२७ लोकाभिमुख बनवावा.**
> **- शेखर सिंह,**
> **आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका**

## महत्वाचे...



### जिल्हा माहिती अधिकारी पदी युवराज पाटील रुजू

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्याचे जिल्हा माहिती अधिकारी म्हणून युवराज पाटील यांनी आज पदभार स्वीकारला. यावेळी माहिती अधिकारी सचिन गाढवे यांनी त्यांचे स्वागत केले. श्री. पाटील यांनी यापूर्वी सहायक संचालक मंत्रालय, सहायक संचालक विभागीय माहिती कार्यालय, पुणे तर अकोला, वाशिम, सातारा, लातूर आणि जळगाव येथे जिल्हा माहिती अधिकारी या पदावर काम केले आहे. जिल्हा माहिती कार्यालयामार्फत शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजना, उपक्रम आणि विकासकामांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणारे महत्वाचा दुवा मानला जातो. शासनाची ध्येयधोरणे आणि जनहिताचे कार्यक्रम प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहीन, असेही श्री. पाटील म्हणाले. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

### गौरी पूजनानिमित्त १ सप्टेंबर रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय कामकाज बंद

**पुणे । प्रतिनिधी**

गौरी पूजनानिमित्त १ सप्टेंबर रोजी जिल्ह्यात स्थानिक सुट्टी असल्यामुळे प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड अंतर्गत वाहन चालन प्रशिक्षण व संशोधन (आयडीटीआर) येथील कामकाज बंद राहणार आहे; त्यामुळे अर्जदारानी अनुज्ञप्ती चाचणीकरिता पुढील ७ दिवसांत कामकाजाच्या दिवशी अपॉइंटमेंट रिशेड्युल करुन घ्यावी. शिकाऊ अनुज्ञप्तीची वैधता १ सप्टेंबर रोजी समाप्त होत असलेल्या अर्जदारांनी २९ ऑगस्ट २०२५ रोजी आयडीटीआर येथे चाचणी द्यावी, असेही पिंपरी-चिंचवडचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

### दारू विक्रीप्रकरणी दोघांना अटक ; १.१० लाखांची दारू जप्त, दोघांना अटक

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात दारूबंदी असतानाही अवैध दारू विक्री उघडकीस आली आहे. खडक पोलिसांनी शुक्रवार पेठेत छापा टाकून तब्बल १.१० लाख रुपयांची देशी-विदेशी दारू जप्त केली. या प्रकरणात दोघांना अटक करण्यात आली असून, स्थानिक मटका रॅकेटर नंदू नाईकविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक करण्यात आलेल्यांची नावे वैभव विजय डोंगरे (२६, रा. शाहू चौक, शुक्रवार पेठ, मूळचा अमरावती) आणि गुडुकुमार भोलाकुमार कुमार (२६, रा. रौनक बार, मूळचा उत्तर प्रदेश) अशी आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश चतुर्थीच्या दिवशी शहर व जिल्ह्यात दारू विक्रीवर संपूर्ण बंदी होती. मात्र, गुप्त माहितीच्या आधारे खडक पोलिसांनी शुक्रवार पेठेतील रौनक बारच्या पार्किंगमध्ये संध्याकाळी साडेसहाला छापा टाकला. या कारवाईत १.१० लाख रुपयांची दारू जप्त झाली. दारूचा साठा नंदू नाईक यांचाच असल्याचे तपासात स्पष्ट झाले असून, त्यांनी 'ड्राय डे' आदेश धुडकावून विक्रीसाठी निर्देश दिले होते. त्यानुसार नाईकविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू आहे.



विजयाचा गुलाल घेऊन आल्याशिवाय मुंबई सोडायची नाय हा निर्धार करुन गेलेला माझा गरजवंत थकलेला मराठा जागा मिळेल तिथे भुईवर आराम करताना...!

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' यशस्वी करण्याचे आवाहन : ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे (दि. २६): ग्रामविकासाला चालना देणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आणि लोकसहभागातून गावांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक घटकाला सोबत घेऊन काम करावे, असे आवाहन ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी केले. गणेश कला क्रीडा मंच येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते.

या अभियानाची सुरुवात १७ सप्टेंबर रोजी होणार असून, पुढील १०० दिवसांत राज्यातील साडेसात हजार गावे यात सहभागी होतील. प्रत्येक तालुक्यात २० गावे निवडली जातील आणि चांगली कामगिरी करणाऱ्या १,९२० गावांना तसेच संबंधित जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींना बक्षिसे दिली जाणार आहेत.




ग्रामपंचायत सक्षमीकरण, शंभर टक्के घरकुलांचा लाभ, आयुष्मान भारत कार्ड, स्मशानभूमी विकास अशा विविध उपक्रमांवर भर दिला जाणार आहे. या कामांसाठी गावागावात महिला बचत गट, तरुण मंडळे, माजी सैनिक संघटना, नागरिक संघटना आदींना सहभागी करण्याचे निर्देश देण्यात आले. या कार्यशाळेत आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार यांनी हिवरे बाजारच्या विकासाचे उदाहरण देत लोकसहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. तर प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी ग्रामीण उत्पन्नवाढीसाठी शाश्वत उपजिविकेच्या साधनांची आवश्यकता असल्याचे सांगितले. डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी अभियानाची उद्दिष्टे व अंमलबजावणीचे निकष मांडले.

कार्यक्रमात राष्ट्रीय पंचायत पुरस्कार विजेत्या गावांच्या सरपंचांसह राज्यातील प्रथम १० जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतींचा गौरव करण्यात आला. राज्यभरातील अधिकारी, सरपंच व पंचायत प्रतिनिधींनी या अभियानात प्रवीण प्रशिक्षक म्हणून सहभागी होण्याचे ठरविले आहे.

# सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपूल पोलिस बंदोबस्तात; उद्घाटन लांबणीवर, नागरिकांची नाराजी

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावर वीर शिवा काशीद चौक ते हिंगणे यादरम्यान उभारलेला उड्डाणपूल अद्यापही उद्घाटनाच्या प्रतीक्षेत असून सध्या तो पोलिस संरक्षणाखाली आहे. नुकतेच आचार्य आनंदऋषीजी चौकातील उड्डाणपूल उद्घाटन झाल्यानंतर या पुलाचे उद्घाटन होणार होते, मात्र काम अपूर्ण असल्याचे कारण देत तो कार्यक्रम रद्द करण्यात आला. यामुळे विविध राजकीय पक्षांनी आंदोलने छेडून उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी केली होती.

सिंहगड रस्त्यावर ११८ कोटी खर्चून तीन टप्प्यात उड्डाणपुलाचे बांधकाम करण्यात आले आहे. पहिल्या दोन टप्प्यांतील पूल सुरु झाले असले तरी तिसरा टप्पा अद्यापही बंद आहे. या विलंबामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालक त्रस्त झाले असून, विरोधी पक्षांनी नागरिकांना वेठीस धरू नये अशी भूमिका घेतली आहे.

अलीकडेच मनसे, शिवसेना (उद्धव गट), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यासह विविध पक्षांच्या नेत्यांनी आंदोलन करत प्रशासनावर दबाव आणला. आमदार परदेशात असल्यामुळे उद्घाटन थांबले आहे, मग व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे का करू नये? असा सवाल मनसे नेत्यांनी केला. तर सामान्य जनता वाहतूक कोंडीत अडकली आहे, पण पोलिस उड्डाणपूल जपण्यात गुंतले आहेत अशी टीका शिवसेना नेत्यांनी केली.

काँग्रेसचे अविनाश खंडारे यांनी तांत्रिक चाचण्या बाकी असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मुख्यमंत्री वेळ देत नाहीत म्हणूनच पूल बंद आहे असा आरोप केला. राष्ट्रवादीचे लखन वाघमारे यांनी करदात्यांच्या पैशाने तयार झालेला पूल नेत्यांच्या अनुपस्थितीमुळे अडकून ठेवणे ही जनतेचा अपमान असे म्हटले.

दरम्यान, प्रकल्प अभियंता दिनकर गोजारे यांनी सांगितले की, सुरक्षेच्या दृष्टीने काही अंतिम कामे सुरू असून ती पूर्ण होताच उड्डाणपूल तातडीने वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल. मात्र, तोपर्यंत पुलाभोवती पोलिस बंदोबस्त कायम ठेवण्यात येणार आहे.



# गोदाम बांधकाम उभारणी व तेलबिया प्रक्रिया यूनिट घटकासाठी अर्ज करावेत

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान गळीतधान्य योजनेंतर्गत जिल्ह्यात गोदाम बांधकाम घटकासाठी अनुदान देण्यात येणार असून जिल्ह्याकरीता २५० मे. टन गोदाम बांधकामासाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियान गळीतधान्य अंतर्गत १ गोदाम व १ तेलबिया प्रक्रिया युनिटचे उद्दीष्ट प्राप्त आहे. याकरीता शेतकरी उत्पादक संघ व शेतकरी उत्पादक कंपनी यांचेकडून गोदाम बांधकाम उभारणीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

प्रत्यक्ष झालेल्या गोदाम बांधकामाच्या ५० टक्के किंवा १२ लाख ५० हजार रूपये जे कमी असेल अशी अनुदान मर्यादा निश्चित करण्यात आलेली आहे. काढणी पश्चात पायाभूत सुविधांतर्गत तेलबिया प्रक्रिया युनिट (१० टन क्षमता) आणि तेलबियांवर प्रक्रिया करण्यासाठी यंत्रसामग्री आणि उपकरणे या घटकासाठी प्रकल्प खर्चाच्या ३३ टक्के कमाल ९ लाख ९० हजार रूपये यापैकी जे कमी असेल त्याप्रमाणे अनुदान अनुज्ञेय आहे.

काढणी पश्चात पायाभूत सुविधा अंतर्गत तेलबिया प्रक्रीया युनिट निवडलेल्या लाभार्थ्याने स्वखर्चाने प्रकल्प तयार केला असल्यास प्रकल्पाचे मुल्यांकन, मूल्यमापन व उभारणी नंतर मुल्यांकन करून किंवा निवडलेल्या लाभार्थ्याने राष्ट्रीयकृत बँकेकडून कर्ज घेतले असल्यास कर्ज मंजूर केल्यानंतर अर्जदार याबाबीच्या लाभास पात्र राहील. इच्छुक शेतकरी संघ व कंपनी यांनी या योजनेत सहभागी होण्याकरीता ३० ऑगस्ट २०२५ पर्यंत संबधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयास आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी संजय काचोळे यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये केले आहे.

### शेतकऱ्यांनी पिकांची ई-पिक पाहणी करुन घेण्याचे आवाहन

**पुणे । प्रतिनिधी**

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार हंगाम २०२५-२६ मध्ये राज्यात नाफेड व एनसीसीएफच्या वतीने पणन महासंघामार्फत कडधान्य व तेलबियांची (मुंग, उडिद, सोयाबीन व तुर) खरेदी करण्यात येणार आहे. ही खरेदी प्रक्रिया शेतकऱ्यांच्या हितासाठी पारदर्शक, कार्यक्षम व संपूर्णपणे ऑनलाईन प्रणालीद्वारे पार पाडली जाणार आहे. केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेण्याकरिता जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची ई-पिक पाहणी शासनाने दिलेल्या कालावधीत पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे.

# बनावट सही व शिक्क्याच्या पत्रापासून सतर्क रहा

**पुणे । प्रतिनिधी**

पांढरेवाडी व जिरेगाव ता. दौंड जि. पुणे ही गावे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, फेज-२ झोन मध्ये समाविष्ट करण्याबाबतचा प्रस्ताव भूसंपादन अधिकारी क्र.०३ पुणे यांच्या कार्यालयाकडून भूसंपादन अधिकारी क्र.०३ यांची बनावट सही व कार्यालयाचा शिक्क्याचा वापर करुन कार्यालयाचा जा.क्र.उपजि/भूसं ३/कावि/४२१/२०२५, दि. २० जुलै २०२५ रोजीचे निवेदन अशा आशयाचे पत्र मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ, मरोळ इंडल क्षेत्र,




महाकाली लेणी रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००९३ यांना पाठविल्याचे पत्र सामाज माध्यमावरुन प्रसारीत होत आहे.

भूसंपादन अधिकारी क्र.०३ पुणे यांच्या सही व शिक्क्याचे बनावट पत्र तयार करुन नागरीकांची दिशाभूल करीत आहेत. बनावट पत्राबाबत अज्ञाताविरुद्ध शासकीय कामात हस्तक्षेप, सही व शिक्क्याचा गैरवापर करुन नागरिकांमध्ये दिशाभूल करणारे वातावरण तयार करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करुन कायदेशी कारवाई करणेबाबत बंडगार्डन पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली आहे.

तथाकथित निवेदन भूसंपादन क्र.०३ कडून देण्यात आले नसून, ते पूर्णपणे खोडसाळ व बनावट असून, नागरीकांनी अशा दिशाभूल करणाऱ्या पत्रापासून सतर्क रहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.०३ पुण्याच्या डॉ. संगीता राजापूरकर-चौगुले यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त पुण्यात ३३१ पदक विजेत्यांचा गौरव


## राज्य सरकारच्या मिशन लक्ष्यवेध हाय परफॉर्मन्स सेंटरचा शुभारंभ

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागातर्फे शुक्रवार, दि. २९ ऑगस्ट रोजी पुण्यातील म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात ३३१ पदकविजेत्यांचा गौरव करण्यात येणार आहे. यावेळी राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मिशन लक्ष्यवेध हाय परफॉर्मन्स सेंटर योजनेचा शुभारंभही होणार आहे.

शुक्रवारी दुपारी ४ वाजता होणाऱ्या या समारंभाला उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह लोकप्रतिनिधी, विभागीय अधिकारी व क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

उत्तराखंड येथे फेब्रुवारीत झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने एकूण २०१ पदकांची कमाई करून प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यात ५५ सुवर्ण, ७० रौप्य आणि ७६ कांस्य पदकांचा समावेश आहे. या स्पर्धेत राज्यातील ३१४ पदकविजेते खेळाडू आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर यश संपादन करणारे ६ खेळाडू यांचा गौरव केला जाणार आहे. सुवर्णपदक विजेत्यांना ७ लाख, रौप्यपदक विजेत्यांना ५ लाख आणि कांस्यपदक विजेत्यांना ३ लाख असे रोख पारितोषिक दिले जाणार असून मार्गदर्शकांनाही



अनुक्रमे ५० हजार, ३० हजार आणि २०हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाणार आहे. एकूण २८.७० कोटी रुपयांची पारितोषिके वितरित होणार आहेत.

पदक विजेत्यांमध्ये ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळे, आशियाई पदक विजेती राही सरनोबत, ऑलिम्पिकपटू देवेंद्र वाल्मिकी, विश्वकरंडक विजेती प्रियंका इंगळे यांचा समावेश असून सर्वाधिक ८ पदके पटकावणाऱ्या आदिती हेगडे हिला तब्बल ३२ लाख रुपयांचे पारितोषिक मिळणार आहे.

या कार्यक्रमात मिशन लक्ष्यवेध योजनेचे बोधचिन्ह अनावरण करण्यात येणार असून, राज्य सरकार दरवर्षी १६० कोटी रुपये खर्च करून १२ क्रीडा प्रकारातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण उपलब्ध करून देणार आहे. पहिल्या टप्प्यात अ‍ॅथलेटिक्स, हॉकी, कुस्ती, वेटलिफ्टिंग, रोईंग आणि लॉन टेनिस या सहा क्रीडा प्रकारांचा समावेश आहे, अशी माहिती सहसंचालक सुधीर मोरे यांनी दिली. कार्यक्रमाला राज्यातील ३०० खेळाडू, १०० मार्गदर्शक, १०० पदाधिकारी व क्रीडा प्रबोधिनीतील प्रशिक्षणार्थी अशा एकूण ८०० जणांची उपस्थिती राहणार आहे.

# गणेशात्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश दर्शन सहलीचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

पर्यटन संचालनालय, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. व पुणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने गणेशोत्सव कालावधीत देशी-विदेशी पर्यटकांकरिता पुण्यातील नामांकित गणेश मंडळाच्या दर्शनाकरिता गणेश दर्शन सहलीचे आयोजन करण्यात येणार आहे; अधिकाधिक पर्यटकांनी या सहलीचा सहभाग लाभ घेण्याकरिता नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

या उपक्रमाअंतर्गत वय ६० वर्षे व त्याहून अधिक वर्षांच्या ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींना गणेश दर्शन सहल आयोजित करण्यात येत आहे. १ सप्टेंबर रोजी ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींसाठी त्रिशुंडया गणपती, कसबा गणपती, तांबडी जोगेश्वरी, तुळशीबाग, दगडूशेठ हलवाई, श्रीमंत भाऊसाहेब रंगारी गणपती ट्रस्ट, बाबू गेनू गणपती व अखिल मंडई मंडळ या गणपतींच्या थेट दर्शनाची सुविधा करण्यात येणार आहे. इच्छुकांकरिता दि. १ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० ते दु. १.३० वाजेपर्यंत कात्रज डेपो, हडपसर (गाडीतळ), कोथरुड डेपो, शिवाजीनगर (मॉडेल कॉलनी) व येरवडा (गुंजन टॉकीज) या आगारामधून पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांच्या ५ वातानुकूलीत बसेस (प्रती बस ३५ प्रवासींकरीता) उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठी पर्यटन विभागाव्दारे मार्गदर्शक, अल्पोपहार, पाणी व आरोग्य सेवक (प्रथमोपचार संचासह) आदींची सोय करण्यात आली आहे. नाव नोंदणीकरणेरिता गणेश बेंद्रे (संपर्क क्रमांक ९७३०९९३२८२) करावा, क्युआर कोड वर जाऊन नोंदणी करावी, असे आवाहन विभागीय पर्यटन कार्यालयाच्या उपसंचालक शमा पवार यांनी केले आहे.